दैनिक
# वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.२७ एप्रिल २०२६ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक २३८ | पाने ४ | किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 27 April 2026 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 238 | Pages 4 | Rate 4 Rs

### महाराजांबद्दल कोणतेही अपशब्द खपवून घेणार नाही

**मुंबई**–महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबद्दल बागेश्वर धामचे धीरेंद्र शास्त्री आणि आमदार संजय गायकवाड यांनी केलेल्या वादग्रस्त विधानांमुळे राज्यात संतापाची लाट उसळली असून, या पार्श्वभूमीवर अभिनेता रितेश देशमुख याने आपली रोखठोक भूमिका मांडली आहे. महाराजांबद्दल वापरलेले कोणतेही अपशब्द किंवा आक्षेपार्ह विधाने शिवप्रेमी कधीही खपवून घेणार नाहीत, असे त्याने स्पष्ट केले आहे.अभिनेता रितेश देशमुख आणि जिनिलिया देशमुख सध्या त्यांच्या 'राजा शिवाजी' या आगामी भव्य चित्रपटाच्या प्रसिद्धीनिमित्त महाराष्ट्र दौऱ्यावर असून, या प्रवासात त्यांनी भिवंडीतील शिवक्रांती प्रतिष्ठानच्या छत्रपती शिवाजी महाराज मंदिर शक्तीपीठाला भेट देत महाआरती केली. यावेळी माध्यमांशी बोलताना रितेशने छत्रपती शिवाजी महाराजांच्या सन्मानाचा मुद्दा अधोरेखित करत स्पष्ट केले की, महाराजांबद्दल वापरलेले कोणतेही आक्षेपार्ह शब्द किंवा विधाने शिवप्रेमी कधीही खपवून घेणार नाहीत.

# महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना अभय देण्यासाठीच सरकार सत्तेत का ?

## सत्तेतले लोक बाबांच्या पायाशी लोळण घेतात,म्हणूनच भोंदूंची मस्ती वाढली–विजय वडेट्टीवार

### चंद्रपुरात लवकरच आमचा महापौर

चंद्रपूरच्या राजकारणावर भाष्य करताना वडेट्टीवार म्हणाले की, आमच्या काही चुकांमुळे सत्ता गेली असेल,पण आता चित्र बदलले आहे. महापालिकेत फक्त २४ नगरसेवक सोडले तर ४२ नगरसेवक आमच्या संपर्कात आहेत. महापौर उतरवण्याची तयारी पूर्ण झाली असून, लवकरच चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता दिसेल. भाजपचा बालेकिल्ला ढासळायला वेळ लागणार नाही असा इशारा काँग्रेस विधिमंडळ नेते वडेट्टीवार यांनी दिला.

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राज्यातील महायुती सरकार महापुरुषांचा अपमान करणाऱ्यांना अभय देण्यासाठी सत्तेत बसले आहेत काय? असा संतप्त सवाल काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. तर छत्रपती शिवाजी महाराज कोणापुढे झुकले असते तर स्वराज्य निर्माण झाले नसते. सत्तेत बसलेले लोक या बाबांच्या पायाशी लोळण घेतात, म्हणूनच या भोंदूंची मस्ती वाढली आहे, आणि ते महाराजांचा अपमान करतात, असे वडेट्टीवारांनी म्हटले आहे. विजय वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणाऱ्या धीरेंद्र शास्त्री विरोधात वडेट्टीवार यांनी जोरदार प्रहार केला. ज्याला महाराष्ट्राचा इतिहास माहित नाही, ज्याची अक्कल कवडीची आहे, अशा भोंदू माणसाने महाराजांवर भाष्य करण्याची हिंमत कशी केली? जेव्हा या भोंदूने महाराजांचा अपमान केला तेव्हाच मुख्यमंत्र्यांनी का थांबवले नाही? नंतर बोलून उपयोग नाही. तसेच, संजय गायकवाड सारखे शिवप्रेमी आता कोणत्या बिळात लपून बसले आहेत? आता का बोलत नाही,शिव्या देत नाही असा सवालही वडेट्टीवार यांनी विचारला.मुख्यमंत्री फडणवीस आणि उद्धव ठाकरे यांच्या भेटीवर प्रश्न विचारला असताना वडेट्टीवार म्हणाले की अशी भेट झाली की नाही हे ते दोन्ही नेते सांगू शकतात.पण मोहित कंबोज यांच्या मुलीच्या वाढदिवसानिमित्त जवळीक वाढल्याचा चर्चा आहेत. याबाबत अधिक भाष्य करणे उचित नाही असे त्यांनी स्पष्ट केले.



### तेलंगणा होते.. तर महाराष्ट्रात का नाही?

महाविकास आघाडी सत्तेत असताना गोपीचंद पडळकर, सदावर्ते यांना हाताशी धरून एसटी कर्मचाऱ्यांचा संप करण्यात आला होता. जे महायुती सरकारला जमले नाही तेलंगणा सरकारने ते करून दाखवले आहे. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असताना विलीनीकरणाच्या मागणीवर भाजपचा घसा का सुकला? एसटी ही ग्रामीण भागाची जीवनवाहिनी आहे. विरोधी पक्षात असताना एसटीच्या विलीनीकरणासाठी जे ओरडत होते, ते आता सत्तेत आल्यावर मूग गिळून गप्प का आहेत? तेलंगणा सरकारने एसटीचे विलीनीकरण केले, एसटी कर्मचाऱ्यांच्या ३१ मागण्या मान्य केल्या. त्यांच्या कामाच्या वेळा कमी केल्या, पगारवाढ दिली ,नोकरीत नियमितीकरण केले. तर महाराष्ट्रात हे का होऊ शकत नाही? सत्तेची उब मिळाल्यावर भाजपला एसटी कामगारांच्या संघर्षाचा विसर पडला आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

# दिया क्रिकेट मधुन आंतरराष्ट्रीय खेळाडू उदयाला येतील–जिल्हाधिकारी जॉन्सन

## कानडी माळी येथे दिया क्रिकेट अकॅडमी व भव्य स्टेडियमचे दिमाखात लोकार्पण

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**




केज तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रात एक ऐतिहासिक पाऊल पडले असून, लव्हरी रोड,कानडीमाळी येथे दिया क्रिकेट अकॅडमी व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रिकेट स्टेडियम चा लोकार्पण सोहळा उत्साहात संपन्न झाला. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या शुभहस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला श्री. जतीन रहमान मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद बीड,श्री. सुरजजी केंद्रे जिल्हा न्यायाधीश सोलापूर, सुनील लांजेवार अतिरिक्त पोलीस अधीक्षक आणि व्यंकट राम पोलीस उपअधीक्षक केज आदी दिग्गज प्रशासकीय अधिकारी यावेळी उपस्थित होते.

अकॅडमीचे सचिव डॉ. दिनकर राऊत आणि अध्यक्ष श्री.डी.बी.माळी यांच्या अथक परिश्रमा तून हे स्टेडियम साकारले आहे.ग्रामीण भागातील गुणवान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देणे हा या अकॅडमीचा मुख्य उद्देश आहे.यावेळी केज येथील 'हास्य क्लब'च्या सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचे स्वागत केले.या सुसज्ज अकॅडमीमुळे केज तालुक्यातून भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकणारे क्रिकेटपटू घडतील,असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी व्यक्त केला.यावेळी खेळाडू तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.दिनकर राऊत यांनी केले तर सुत्र संचालन हनुमंत भोसले यांनी केले.राष्ट्रगीताने कार्यक्रम संपन्न झाला.

# केज तालुका जनगणना प्रशिक्षणाची नियोजनबद्ध सुरुवात

## दिल्ली येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रशिक्षण स्थळी भेट; प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

आगामी जनगणना २०२७ प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यात प्रगणक व पर्यवेक्षक प्रशिक्षणाला वेग आला असून २५ एप्रिल रोजी आयोजित प्रशिक्षण सत्रात वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन प्रशिक्षणाची पाहणी केली व प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले. जीवन शिक्षण विद्यालयात जनगणना प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पूर्ण झाला याचा समारोप शनिवार रोजी संपन्न झाला यावेळी दिल्ली येथून आलेले पथक प्रमुख गृहमंत्रालय भारत सरकार प्रतिनिधी असीम तालुकेदार, अनुज गोठी, बीड जिल्हा समन्वयक आशिष शिंदे यांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षण केंद्राचे मार्गदर्शक तहसीलदार अशोक भंडारे नायब तहसीलदार विकास हजारे, जनगणना लिपिक शुभम



राऊत,जनगणना ऑपरेटर कामेश वाघमारे यांच्या नियोजनाखाली प्रशिक्षण पूर्ण होत आहे. प्रशिक्षणाची प्रगती तपासली यावेळी त्यांनी वर्गात प्रत्यक्ष जाऊन प्रशिक्षणाची पद्धत, विषय मांडणी व प्रात्यक्षिके यांचा आढावा घेतला.

**प्रशिक्षण अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सुरू**

एकूण चार बॅचमध्ये हे प्रशिक्षण पूर्ण होत आहे ग्रामीण एकूण प्रगनक ४२७ एकूण सुपरवायझर ७० एकूण फिल ट्रेनर ६ याप्रमाणे नियोजन केले जात आहे प्रगणक व पर्यवेक्षक एकाग्रतेने मार्गदर्शन ऐकत आहेत. डिजिटल सादरीकरण, फळ्यावरचे प्रात्यक्षिक आणि प्रत्यक्ष संवाद या माध्यमातून प्रशिक्षण दिले जात आहे. प्रशिक्षणार्थींनीही विविध प्रश्न विचारत सक्रिय सहभाग नोंदवला मार्गदर्शन करताना सांगितले की, जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया आहे. प्रत्येक प्रगणकाने आपली जबाबदारी समजून अचूक व पारदर्शक माहिती संकलित करावी. नागरिकांशी विश्वासपूर्वक संवाद साधणे ही यशस्वी जनगणनेची गुरुकिल्ली आहे. सर्वांनी या प्रक्रियेत सक्रियपणे सहभागी व्हावे असे मत व्यक्त केले.

## संघर्ष नारीचा

ती जन्मली तेव्हा कुणी हसले, कुणी सुस्कारे टाकले,
पण तिच्या डोळ्यांत मात्र स्वप्नांचे दीप उजळले...

लहानपणापासूनच तिने ऐकले, तू मुलगी आहेस,
मर्यादांच्या भिंतींमध्येच जगायचं आहेस...

पण तिच्या मनात होती उंच भरारी घेण्याची जिद्द,
आकाशालाही गाठायची होती तिचीच हिम्मत!

प्रत्येक पावलावर अडथळे, प्रत्येक वळणावर प्रश्न,
तरीही न थांबता ती लढत राहिली, हा तिचा दृढ निश्चय स्पष्ट...

कधी शब्दांनी जखमा झाल्या, कधी नजरेने टोचलं,
तरीही तिने स्वत:ला पुन्हा उभं केलं, मनाला सावरलं...

घर, समाज, आणि स्वप्न यांच्यात ती सतत झुंज देत राहिली,
आपलं अस्तित्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येक क्षणाशी भिडली...

अश्रू लपवून हसणं तिने शिकलं,
आणि अपयशालाही यशात बदलणं तिनेच दाखवलं...

आज ती उभी आहे स्वत:च्या पायावर ठाम,
तिच्या संघर्षानेच दिला तिला यशाचा मुकुट आणि नाम...

ती फक्त मुलगी नाही, ती शक्ती आहे, ती ओळख आहे,
तिच्या संघर्षातूनच नव्या जगाची सुरुवात आहे...

:: संपादक ::
अजय भांगे



# नगराध्यक्षा बनसोड व गटनेते इनामदार यांच्या धाडसी भूमिकेमुळे घरकुल घोटाळा उघडकीस

## ४.२४ कोटींच्या अफरातफरीप्रकरणी ६ जणांवर गुन्हा दाखल; सुरुवातीपासूनच केली होती चौकशीची मागणी

दैनिक वादळ वार्ता

**केज । प्रतिनिधी**

केज नगरपंचायतीतील घरकुल घोटाळ्याचा अखेर मोठा भंडाफोड झाला असून, या प्रकरणात नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड आणि गटनेते डॉ. हारुणभाई इनामदार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. गोरगरिबांच्या हक्काच्या निधीची अफरातफर होत असल्याचा संशय व्यक्त होताच त्यांनी तात्काळ पत्रकार परिषद घेत ठोस पुरावे सादर केले होते. त्यांच्या या धाडसी पावलामुळेच आज संपूर्ण प्रकरण उघडकीस आले आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या घरकुल निधीमध्ये तब्बल ४ कोटी २४ लाख ७३ हजार २३ रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत यांच्यासह सहा जणांविरोधात केज पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





नगराध्यक्षा बनसोड व गटनेते इनामदार यांनी सुरुवातीपासूनच या प्रकरणाची गंभीरता ओळखून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. गरिबांच्या हक्काचा पैसा कुणीही लाटू देणार नाही, अशी ठाम भूमिका त्यांनी घेतली होती. त्यांच्या पाठपुराव्यानंतरच बीड जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी समिती नेमून सखोल तपास सुरू केला.

चौकशीदरम्यान निधी नियमबाह्य पद्धतीने इतर खात्यांवर वळवण्यात आल्याचे, तसेच शासकीय कागदपत्रे गायब केल्याचे स्पष्ट झाले. या सर्व प्रकारामुळे नगराध्यक्षा व गटनेते यांनी उचललेले पाऊल किती योग्य होते, हे अधोरेखित झाले आहे.सध्याचे मुख्याधिकारी अजित ढोपे यांच्या फिर्यादीवरून पोलिसांनी तत्कालीन मुख्याधिकारी मिलिंद सावंत यांच्यासह एकुण सहा जनावर भारतीय दंड विधानाच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

दरम्यान, नगराध्यक्षा बनसोड व गटनेते इनामदार यांच्या धाडसी व पारदर्शक भूमिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळेच गोरगरिबांच्या न्यायासाठी लढा यशस्वी ठरला असून, भ्रष्टाचाराविरोधात एक ठोस संदेश गेला आहे.

आता या प्रकरणातील सर्व दोषींवर कठोर कारवाई व्हावी, तसेच अपहार झालेला निधी परत मिळवून लाभार्थ्यांना न्याय मिळावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# संपादकीय

## मराठी बोलायची कोणी ?

अभिजात भाषेचा मान मिळवूनही आज मराठी आपल्याच घरात पोरकी होतेय की काय, अशी भीती वाटू लागली आहे. रिक्षा–टॅक्सीचालकांनी मराठी बोललं पाहिजे ही मागणी कायदेशीररीत्या योग्यच आहे, पण जेव्हा दोन मराठी माणसं एकमेकांशी हिंदीत संवाद सुरू करतात, तेव्हा त्या मागणीतील धार कमी होते.राज्यातील रिक्षा आणि टॅक्सीचालकांसाठी एक मेपासून केलेला मराठी सक्तीचा निर्णय सध्या मत–मतांतरांनी गाजतो आहे. या निर्णयाला कायदेशीर आधार असल्याने त्याला थेट विरोध करणं कोणालाही अडचणीचंच आहे. त्यामुळे, वेगवेगळी खुस्पटं काढून त्यात खोडा घालण्याचा प्रयत्न सुरू आहे. राजकीय पक्षांमध्ये या निर्णयाला विरोध शिवसेनेतूनच झाला आहे. शिवसेनेतील अमराठी, उत्तर भारतीय नेते संजय निरुपम यांना प्रकाशझोतात येण्यासाठी हे चांगलं निमित्त मिळालं. यात दोन गंमती आहेत. मूळ निर्णय परिवहन विभागाचा आहे. त्याचे मंत्री प्रताप सरनाईक हे शिवसेनेचे नेते आहेत. त्यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी उभे राहिलेले पहिले नेते निरुपमही त्याच पक्षाचे आहेत!निरुपम मूळ पत्रकार. ते मुंबईत राजकीय क्षितिजावर उगवले ते पूर्वीच्या, म्हणजे मूळ शिवसेनेतून. हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे असतानाच. दोन वेळा खासदारकी झाल्यानंतर ते काँग्रेसवासी झाले. तिथून पुन्हा विभाजित शिवसेनेच्या, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटात सामील झाले. सरनाईक यांच्या निर्णयाला विरोध करण्यासाठी त्यांनी काल दहिसर गाठलं. तिथे त्यांची महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सैनिकांशी गाठ पडली. त्यातून जो गोंधळ व्हायचा, तो झाला. रिक्षा–टॅक्सीचालकांसाठी मराठीसक्तीचा मुद्दा त्यामुळे वादाचा झाला. मनसेने आता साहजिकच त्यात पुढाकार घेतला आहे. 'महाराष्ट्रात मराठीचं भवितव्य' हा चिंतेचा विषय आजचा नाही. दशकानुदशके या विषयावर चर्वितचरण सुरू आहे. मराठीची पीछेहाटही अव्याहत सुरू आहे!! दरम्यानच्या काळात मोठा जोर लाऊन, राजकीय परिस्थितीचा फायदा उठवून महाराष्ट्राने मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळवला. हा दर्जा देणं केंद्राचं काम होतं. महाराष्ट्राच्या सरकारने ते केंद्राला करायला लावलं. पण, हा दर्जा मिळाल्यानंतर मराठीसाठी काही भरीव करायला हवं होतं ना? दोन–चार संशोधन प्रकल्प तरी सुरू व्हायला हवे होते. निदान मुंबईतल्या 'मराठी भाषा भावना'चं काय? हा प्रश्न विचारायला हवा होता. ते कोणी केलं का? आपली भाषा दुसऱ्याच्या माथी मारून त्यातून मातृभाषेचा विकास होईल, हा समज खरोखरच अजब आहे!भाषावार प्रांतरचनेच्या मूळ उद्देशाला धरून प्रत्येक प्रांतात तिथल्या राज्य भाषेचा वापर आणि विकास झाला पाहिजे, यात कोणाचंच दुमत नाही. कोणी याला विरोध करत असेल, तर त्याला तिथल्या तिथे या देशाच्या रचनेची जाणीव करून दिली पाहिजे. पण, आपली राज्यभाषा, आपली मातृभाषा जपण्याची, तिची प्रतिष्ठा वाढवण्याची, तिच्यात वेळोवेळी भर घालण्याची जबाबदारी त्या त्या भाषिक समूहांची असते. महाराष्ट्रात ही जबाबदारी मराठी भाषकांची आहे. त्यांनी व्यवहारात मराठी वापरली, तरच अन्य भाषकही आपसूक मराठी वापरतील. मराठी वापराची ही सुरुवात मराठी माणसानेच करायला हवी. ती त्याची जबाबदारी आहे. परप्रांतीय, अमराठी भाषकांची नाही. मुंबई ही साऱ्या देशाचं पोट भरणारी नगरी असल्याने इथे संपूर्ण देशातून लोक येत राहतात. वर्षानुवर्षं हे सुरू आहे. त्यामुळे, अन्य प्रांतातून मुंबईत येऊन स्थायिक झालेल्यांच्याही आता तीन – चार पिढ्या इथे नांदल्या आहेत. कायदेशीर भाषेत तेही 'महाराष्ट्रीय'च आहेत. तरीही अशा कुटुंबातल्या अनेकांना व्यवहारापुरतीही नीट मराठी येत नाही, हा दोष कुणाचा? त्यात त्यांचा वाटा तर आहेच; पण त्याहीपेक्षा अधिक त्यांना मराठी बोलणं, मराठी भाषेतून व्यवहार करणं अपरिहार्य न करणाऱ्या इथल्या स्थानिकांचा; म्हणजे मराठी माणसांचा आहे. बॉलिवूडचं केंद्र मुंबई असल्याने म्हणा, देशाची आर्थिक राजधानी ठरल्याने म्हणा, मराठी आणि हिंदीची लिपी एक असल्याने म्हणा, मराठी माणसाच्या न्यूनगंड म्हणा, की अतिभिडस्त स्वभाव म्हणा; पण मराठी माणूस मुंबईत सार्वजनिक ठिकाणी आपोआप हिंदी भाषेत शिरतो, हे ढळढळीत सत्य आहे. लोकल ट्रेनमध्ये सर्व अन्य भाषक आपल्या स्नेह्यांशी फोनवर किंवा अगदी आपसातही तारस्वरात मातृभाषेत बोलतात. सर्रास दिसणाऱ्या या दृश्यात मराठी माणूस तसा बोलताना कधी दिसतो का? दोन अनोळखी मराठी माणसंही आपला संवाद बहुतेकदा हिंदी किंवा इंग्रजीतूनच सुरू करतात. हा दोष कुणाचा? सेमी इंग्लिशचा पुरस्कार करूनही मराठी पालक आपल्या मुलांना शुद्ध इंग्रजी शाळेत घालण्यासाठी जीवाचा आटापिटा करतात. का? कारण, त्यांच्या नेत्यांची, साहित्यिकांची, अभिजात वर्गातली मुलं त्याच शाळेत शिकतात. मराठीतली नवी पिढी मराठीपासून अशी तुटली आहे, हे खरं ना? सामान्य मराठी माणसाने मराठी सण–उत्सव जिवंत ठेवण्याची जबाबदारी आपल्या शिरावर घेतली आहे. आता मराठी भाषा जगवण्याची जबाबदारीही त्यानेच घ्यायला हवी का? ते होत नाही, म्हणून भाषा जगवण्यासाठी तिचा असा विस्तार करायचा आहे का?मुळात वाहनचालक ज्या राज्यात परवाना घेत असेल, त्या राज्याची भाषा किमान स्वरूपात त्याला यायलाच हवी, असा नियम आहे. महाराष्ट्रात २०११ मध्येच त्याचा अंतर्भाव झाला आहे. त्याची कडक, अनिवार्य अंमलबजावणी व्हावी यासाठी सरकारने आता भूमिका घेतली आहे आणि ती योग्यच आहे. मध्य मुंबईतले अमराठी दुकानदार चांगली मराठी बोलतात. कारण, ती त्यांची व्यावसायिक गरज आहे. सर्व मराठीबहुल भागात हा अनुभव येईल. मुंबईने मराठी बोलावं असं वाटत असेल, तर मुंबईच्या वातावरणात मराठी पाहिजे. कानावर सतत मराठी पडली पाहिजे. परप्रांतीय टॅक्सी आणि रिक्षाचालक इथे निव्वळ पोट भरायला आले आहेत. मराठीचा दुःस्वास करायला नाही. पोट भरण्यासाठी, व्यवसायासाठी जे आवश्यक, ते ते करतीलच. मराठीही बोलतील. अट एकच आहे, मराठी माणसाने त्याच्याशी मराठीत बोललं पाहिजे. दुसऱ्यावर सक्ती करण्यापूर्वी आपण आपल्यावरच ही सक्ती करायला हवी. तसं केलं तर, ना शासन निर्णयाची गरज भासेल, ना कुठल्या अटी – शर्तींची, ना आंदोलनाची!

# धडगाव तालुक्यात आरोग्य विभागाचा सर्जिकल स्ट्राईक; पश्चिम बंगालमधील बोगस डॉक्टर जेरबंद!

दैनिक वादळ वार्ता

**रवींद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्ह्याच्या दुर्गम आणि आदिवासी बहुल भागात मानवी जिवाशी खेळणाऱ्या बोगस डॉक्टरांविरुद्ध जिल्हा प्रशासनाने आता आक्रमक पाऊल उचलले आहे. धडगाव तालुक्यातील छापरी येथे कोणतीही अधिकृत पदवी किंवा परवाना नसताना बेकायदेशीर दवाखाना थाटून बसलेल्या एका तोतया डॉक्टरला आरोग्य विभाग आणि पोलिसांनी संयुक्त कारवाई करत रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे.जिल्हाधिकारी व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली बोगस डॉक्टरांविरुद्ध मोहीम तीव्र करण्यात आली आहे. धडगाव ते सोन मुख्य रस्त्यालगत असलेल्या छापरी गावातील एका घरातून संशयास्पद वैद्यकीय व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर माहिती तालुका आरोग्य पथकाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे दि. २२ एप्रिल रोजी दुपारी ३,१५ वाजेच्या सुमारास पथकाने सुरेश भारता वळवी यांच्या घरात सुरू



असलेल्या या दवाखान्यावर अचानक छापा टाकला.छापा टाकला तेव्हा अलीक असीत रॉय (वय २६, मूळ राहणार उत्तर २४ परगाणा, पश्चिम बंगाल) हा तरुण रुग्णांवर उपचार करताना आढळला. पथकाने त्याच्याकडे वैद्यकीय व्यवसायाचा परवाना आणि पदवीची मागणी केली असता, त्याने सुरुवातीला नाव सांगण्यास टाळाटाळ केली. सखोल चौकशीत त्याने पश्चिम बंगालमधील एक प्रमाणपत्र दाखवले. मात्र, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे त्याची कोणतीही नोंद नव्हती. महाराष्ट्रात वैद्यकीय व्यवसाय करण्यासाठी आवश्यक असलेले कोणतेही कायदेशीर निकष तो पूर्ण करत नसल्याचे स्पष्ट झाले.

दवाखान्याची झडती घेतली असता पंचांसमक्ष मोठा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यात प्रामुख्याने बी.पी. परेटस, स्टेथोस्कोप, नेब्युलायझर मशीन, सिरींज आणि निडल्स.'निसिप' आणि 'मेट्रोनिडाझोल' सारख्या लोपॅथी गोळ्यांचे शेकडो स्ट्रिप्स.या प्रकरणी धडगाव पोलीस ठाण्यात संशयित अलीक रॉय याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८(३), ३१९(२), ३३६(२), ३४०(२) आणि महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ चे कलम ३३, ३५ व ३६ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई तालुका आरोग्य अधिकारी डॉक्टर कांतीलाल पावरा, डॉक्टर सुभाष पावरा, विस्तार अधिकारी पितांबर पवार, औषध निर्माण अधिकारी श्याम सोनार, समुदाय आरोग्य अधिकारी चेंदा पावरा तसेच पोलीस कर्मचारी मनोहर धनगर आणि अशोक पाडवी यांच्या पथकाने केली.दुर्गम भागात डॉक्टर उपलब्ध नसल्याचा फायदा घेऊन परराज्यातील तोतया डॉक्टर नागरिकांच्या जिवाशी खेळत आहेत. अशा बोगस डॉक्टरांवर केवळ गुन्हे दाखल करून न थांबता, त्यांना आश्रय देणाऱ्यांवरही कारवाई होणे गरजेचे आहे.

# 'ग्राम स्वराज्य', चला खेडी वाचवू या-सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांचे जनतेला आवाहन

## शाश्वत विकास आणि प्रशासकीय संवेदनांचा कस याबाबत केली भावना व्यक्त

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

मानवी संस्कृतीचा पाया 'अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आणि आरोग्य' या पंचसूत्रीवर उभा आहे. निसर्ग आणि मानवी जीवन हे एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. मात्र, आजच्या आधुनिकतेच्या आंधळ्या शर्यतीत आपण निसर्गापासून दूर गेलो आहोत. महात्मा गांधीजींनी दिलेला 'खेड्यांकडे चला' हा मंत्र केवळ एक घोषणा नव्हती, तर ती एक परिपूर्ण, समाधानी आणि निसर्गपूरक जीवनशैलीची दिशा होती. आज वाढती उष्णता, प्रदूषण आणि कचऱ्याचे डोंगर पाहता, गांधीजींचा विचार आणि विनोबांची कर्मनिष्ठा पुन्हा एकदा अंगीकारण्याची वेळ आली आहे.असे मत उरण मधील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांनी व्यक्त केले असून विविध सोशल मीडिया व जनतेला प्रत्यक्ष भेटून ते या बाबत जनजागृती करीत आहेत.

आपले प्रशासक आणि लोकप्रतिनिधी शिक्षित आहेत परंतु साक्षर आणि सार्थक यातील धुसर संभ्रमात आहेत. त्यामुळे प्रशासकीय अनास्था आणि विकास म्हणजेच बांधकाम या चुकीच्या धोरणामुळे जनतेच्या घामाच्या पैशातून, कराच्या माध्यमातून सरकारी निधीतून सुशासन होणे अपेक्षित असताना, प्रत्यक्षात चित्र वेगळे दिसते. शहरांमध्ये टोलेजंग इमारती आणि सिमेंटचे रस्ते होत आहेत, पण श्वास घ्यायला शुद्ध हवा आणि प्यायला शुद्ध पाणी मिळवणे कठीण झाले आहे. विकासाचे आराखडे आखताना पादचारी, सायकलस्वार किंवा सामान्य माणसापेक्षा मूठभर धनदांडग्यांच्या सोयीचा विचार प्राधान्याने केला जात आहे. ही विकासाची चुकीची धोरणे भविष्यात पर्यावरणाचा समतोल बिघडवण्यास कारणीभूत ठरत आहेत.

आचार्य विनोबा भावे यांनी आयुष्यभर विचार आणि व्यवहाराची सांगड घातली. त्यांनी श्रमाला प्रतिष्ठा दिली. आजच्या 'वापरा आणि फेकून द्या' या संस्कृतीमुळे कचऱ्याची समस्या गंभीर झाली आहे. भविष्यातील संकटांवर मात करण्यासाठी आपल्याला एक अशी 'इकोसिस्टिम' हवी आहे, जिथे कचरा ही समस्या न राहता ती 'संपत्ती' बनायला हवी. विकेंद्रित पद्धतीने कचऱ्याचे खतात



रूपांतर होऊन ती मातीला परत मिळायला हवी.

पावसाचा प्रत्येक थेंब जमिनीत जिरवणारी यंत्रणा हवी, जेणेकरून टँकरमुक्त गावे निर्माण होतील. केवळ काँक्रीटचे हायवे नकोत, तर झाडांच्या सावलीत असणारे सायकल ट्रॅक आणि चालण्यासाठी सुरक्षित पदपथ हवेत. जोपर्यंत आपली गावे स्वयंपूर्ण होत नाहीत, तोपर्यंत शहरांवरील ताण कमी होणार नाही. महात्मा गांधीजींच्या स्वप्नातील 'ग्रामस्वराज्यात अन्नापासून ऊर्जेपर्यंत सर्व गोष्टी स्थानिक पातळीवर निर्माण होणे अपेक्षित होते. सौर ऊर्जा, सेंद्रिय शेती आणि स्थानिक रोजगाराला प्राधान्य दिल्यास 'स्वदेशी'चे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार होईल. प्रशासकांनी केवळ फाईलवरचे आकडे न बघता, जमिनीवरचा निसर्ग वाचवण्यासाठी दूरगामी धोरणे आखण्याची गरज आहे. वाढते तापमान आणि निसर्गाचा कोप ही धोक्याची घंटा आहे. विकास म्हणजे केवळ सिमेंटचे बांधकाम नव्हे, तर माणसाचा आनंद आणि निसर्गाचा समतोल होय. जेव्हा आपले लोकप्रतिनिधी स्वतःला 'मालक' न समजता 'सेवक' समजून निसर्गपूरक जीवनशैलीला प्रतिष्ठा देतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने सुराज्य येईल. साधी राहणी आणि निसर्गाशी नाते जोडूनच आपण समृद्ध आणि शाश्वत भविष्याकडे वाटचाल करू शकतो.असे मत उरण मधील सामाजिक कार्यकर्ते विलास गावंड यांनी व्यक्त केले आहे.

# भिगवणच्या पावसाळी समस्यांवर उपाययोजनांसाठी NHAI कडे पाठपुरावा

## ड्रेनेज लाईन, प्रकाशयोजना व सेवा रस्त्यांच्या सुधारणांसाठी निवेदन

## प्रोजेक्ट हेड फणीकुमार मुला यांनी दिले सकारात्मक आश्वासन

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

भिगवण शहराला दरवर्षी पावसाळ्यात भेडसावणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या समस्यांबाबत आज पाटस टोलनाका येथील प्रोजेक्ट हेड फणीकुमार मुला साहेब यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात आली. या बैठकीत भिगवण परिसरातील विविध मूलभूत अडचणी मांडत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण (NHAI) कडे ठोस उपाययोजना सुचविण्यात आल्या.

यामध्ये प्रामुख्याने हॉटेल श्रीशांत ते मदनवाडी चौफुला या सर्व्हिस रोडलगत मोठी ड्रेनेज लाईन उभारण्याची मागणी करण्यात आली. यामुळे पश्चिमेकडील डोंगर परिसरातून येणारे पावसाचे पाणी मोठ्या नाल्यामधून सुरळीत वाहून जाईल आणि



शहरातील पूरस्थिती कमी होण्यास मदत होईल, असे सांगण्यात आले.तसेच, जुन्या ड्रेनेज लाईनमधील पाण्याचे व्यवस्थापन अधिक प्रभावीपणे व्हावे यासाठी मोठ्या चेंबरच्या माध्यमातून त्याची विभागणी करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला. याशिवाय, एस.टी. स्टॅण्ड समोरील पुलावर स्ट्रेट लाईट पोल बसवण्याचे काम अद्याप अपूर्ण असून ते तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली.नवीन प्रस्तावांमध्ये श्रीशांत हॉटेल ते दत्तकला स्कूल, चिंचोली या मार्गावर नव्याने सर्व लाईट पोल बसवावेत, अशीही विनंती करण्यात आली. या मार्गावर प्रकाशयोजना झाल्यास नागरिकांच्या सुरक्षिततेस मोठा हातभार लागणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.या बैठकीत पाटस टोलनाका प्रमुख फणीकुमार मुला साहेब व त्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. त्यांनी भिगवणच्या सर्व अडचणी सविस्तरपणे ऐकून घेतल्या व संबंधित विषयांवर सकारात्मक विचार करून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पुणे जिल्हा उपाध्यक्ष अजिंक्य माडगे, पुणे जिल्हा कोषाध्यक्ष सचिन बोगावत, माजी उपसरपंच प्रदीप वाकसे, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष अमोल देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.भिगवणच्या नागरिकांच्या दैनंदिन अडचणी दूर करण्यासाठी स्थानिक पातळीवर सुरू असलेला हा पाठपुरावा कौतुकास्पद ठरत असून, लवकरच या मागण्यांवर कार्यवाही होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भूमाफियांनी शेतकऱ्यांवर जबरदस्तीने दाखल केले गुन्हे मागे घ्या–दिवा मनसे

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई । प्रतिनिधी**

दिनांक २०/४/२०२६ रोजी भूमाफियांनी दिवा, साबेगाव भागातील शेतकऱ्यांवर जबरदस्तीने दाखल करण्यात आलेले गुन्हे तात्काळ मागे घेण्याबाबत दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी मागणी केली आहे. पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अंतर्गत दाखल करण्यात आलेले कलम १५ व १७ अंतर्गत गुन्हा दाखल केलेले असून दाखल केलेल्या गुन्ह्यामध्ये नंबर २, १० व १४ मजकुरामध्ये चुकीच्या पद्धतीने काही शेतकऱ्यांची नावे टाकण्यात आलेली आहेत सदर जमिनीवर काही भूमापियांनी पत्र्याचं कंपाउंड मारून त्याच्यावर कांदळवनाची कत्तल करून तेथे भराव टाकत आहेत



शेतकऱ्यांना त्या जागेमध्ये प्रवेश देखील दिली जात नाही या बाबत वारंवार शेतकऱ्यांनी मुंब्रा पोलीस स्टेशन व तहसील कार्यालयात तक्रार देखील दिली आहे. तरी देखील भूमाफियांनी संबंधित शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. प्रकरणी दिवा मनसेचे विभाग अध्यक्ष प्रकाश पाटील यांनी मुंब्रा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे यांनी योग्य ती शहनिशा करून शेतकऱ्यांवर होणारे अन्याय कायमचे दूर करावे व त्यांच्यावर नजरचुकीने दाखल करण्यात आलेल्या एफ आय आर मधून त्यांची नावं काढून टाकण्यात यावी ही निवेदनाद्वारे मागणी केली आहे.



**विक्रोळी कन्नमवार नगरातील जनता मार्केट, जयभवानी चौकातील,शिवसाई मित्र मंडळाच्या गुरुनाथ मंदिर याचा मंदिर जीर्णोद्धार विक्रोळीचे आमदार सुनील राऊत यांच्या शुभहस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आला.त्या प्रसंगी विक्रोळी विधानसभा उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधानसभा संघटक शंकर ऊर्फ नाना ढमाले, उपविभाग महिला संघटिका वंदना बेंद्रे, शाखा प्रमुख प्रकाश पुजारे, महिला संघटिका आसावरी भोईटे, मंडळाचे अध्यक्ष प्रदीप ऊर्फ बाबू वेंगुर्लेकर, सरचिटणीस सुरेश सावंत, खजिनदार मनोज गवळी आदी मान्यवर उपस्थित होते.**

# चिचपल्लीचे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र चंद्रपूरसह संपूर्ण देशासाठी आदर्श ठरावे-आ.सुधीर मुनगंटीवार

## आ.सुधीर मुनगंटीवार यांच्या पुढाकाराने चिचपल्लीच्या बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राला नवे बळ

## संशोधन, प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मितीच्या माध्यमातून केंद्राला नवी दिशा

### बांबू फर्निचर, वस्त्रोद्योग, इंधन निर्मिती, सामाजिक उत्तरदायित्व आणि नाविन्यपूर्ण उत्पादनांवर विशेष भर

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**





चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र हे केवळ चंद्रपूरपुरते मर्यादित न राहता संपूर्ण देशासाठी आदर्श ठरणारे संशोधन, प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मितीचे सक्षम केंद्र बनावे, असा विश्वास राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या अध्यक्षतेखाली चिचपल्ली येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्राचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी केंद्राला केवळ प्रशिक्षणापुरते मर्यादित न ठेवता संशोधन, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मितीचे सक्षम केंद्र म्हणून विकसित करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

बांबू फर्निचर, बांबू तंतू, वस्त्रोद्योग, बांबूपासून खाद्यपदार्थ, इंधन निर्मिती, बांबू इंधन गोळे तसेच विविध नाविन्यपूर्ण उत्पादनांच्या निर्मितीवर विशेष भर देत सर्व शासकीय कार्यालयांमध्ये बांबू फर्निचरचा वापर वाढविण्यासाठी शासन निर्णय काढण्याबाबत मुख्य सचिवांशी चर्चा करण्यात येणार असल्याचे आ. मुनगंटीवार यांनी सांगितले. बैठकीला जिल्हाधिकारी वसुमना पंत, श्रीनिवास राव, मुख्य वनसंरक्षक श्री रामानुजन, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक श्री. शुक्ला, कार्यकारी अभियंता श्री. मुकेश टांगले, कार्यकारी अभियंता पूनम वर्मा, सहसंचालक डॉ. मनोज डायगव्हाणे, डॉ. तारिका दगडकर आदी उपस्थित होते.यावेळी आ. सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते वनश्री बांबू दालन या बांबू स्मरणिका दुकानाचे उद्घाटन तसेच बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील मुलींच्या वस्तीगृहाचे लोकार्पण करण्यात आले. या केंद्रातील इमारतीचा आशियातील उत्कृष्ट वास्तूंमध्ये समावेश होत सिंगापूरमधील प्रतिष्ठित नियतकालिकामध्ये उल्लेख झाल्याचा अभिमान व्यक्त करत, दोन वर्षांच्या खंडामुळे केंद्राची गती मंदावली असली तरी आता नव्या उर्जेने काम सुरू करण्याचे निर्देश आ.मुनगंटीवार यांनी दिले.

या केंद्रात 'संशोधन' आणि 'प्रशिक्षण' हे दोन महत्त्वाचे घटक असून संशोधनासाठी आवश्यक भौतिक साधनसामग्री, मनुष्यबळ, खर्च आणि उद्दिष्टे स्पष्टपणे निश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बांबू तंतू, बांबूपासून तयार होणारे कपडे, बांबू फर्निचर, बांबू खाद्यपदार्थ, इंधन गोळे, इंधन निर्मिती, बांबू चटई, विभाजन भिंती, टेबल, कुंपण, पर्यावरणपूरक वृक्षसंरक्षक यांसारख्या उत्पादनांवर संशोधन करण्यावर भर देण्यात आला. वस्त्रोद्योग विभागाच्या योजनांमधील अनुदान बांबू उद्योगाशी जोडता येईल का, याचाही अभ्यास करण्याच्या सूचना आ. मुनगंटीवार यांनी दिल्या.चीन, फिलिपिन्स यांसारख्या देशांमध्ये बांबूपासून होणाऱ्या विविध उत्पादनांचा अभ्यास करण्यासाठी चार ते पाच सदस्यांची विशेष समिती तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. सामाजिक उत्तरदायित्व निधी अंतर्गत पेट्रोलियम कंपन्या, कोल इंडिया, टाटा, सिमेंट कंपन्या तसेच विविध औद्योगिक संस्थांकडून निधी मिळविण्यासाठी प्रयत्न वाढविण्याचेही सांगण्यात आले. निती आयोगाकडे संशोधनासाठी राखीव निधी उपलब्ध होण्यासाठी सविस्तर प्रस्ताव आणि प्रभावी सादरीकरण तयार करून पाठविण्याचे निर्देशही आ.मुनगंटीवार यांनी दिले.

प्रशिक्षण देताना विद्यार्थ्यांना रोजगाराची हमी निर्माण होईल अशा पद्धतीने अभ्यासक्रम तयार करण्यावर भर देण्यात आला. बांबू अभ्यासक्रमांना विद्यापीठांच्या संयुक्त विद्यमाने पदवी स्वरूप देता येईल का, याची तपासणी करण्याचे सांगण्यात आले. तसेच या केंद्राला कौशल्य विकास विभागाशी जोडण्याबाबतही चर्चा झाली. बांबूपासून तयार करण्यात आलेला सात फूट उंच राष्ट्रीय ध्वज प्रधानमंत्री कार्यालयात ठेवण्यात आला असल्याचा उल्लेख करत, केवळ स्मरणिकांपुरते मर्यादित न राहता अधिक नाविन्यपूर्ण उत्पादनांवर भर देण्याची गरज आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली.

बांबूपासून कुंपण, पर्यावरणपूरक वृक्षसंरक्षक, बस थांबे यांसारखी उपयुक्त निर्मिती करण्याचे निर्देश देण्यात आले. शहराच्या विकास आराखड्यानुसार वृक्षविकास आराखडा तयार करणे तसेच वृक्षलागवडीसाठी स्वतंत्र कायद्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी नमूद केले. बांबू वस्तूंची विक्री मोठ्या व्यापारी साखळ्यांमध्ये तसेच विविध विक्री माध्यमांतून वाढविण्याचे निर्देश देण्यात आले. राष्ट्रीय व राज्य वीज मंडळांना वीज निर्मितीसाठी बांबू इंधन गोळे उपलब्ध करून देण्याच्या शक्यता तपासण्यास सांगण्यात आले. कोळसा आणि बांबूच्या उष्मांक क्षमतेचाही तुलनात्मक अभ्यास करण्यावर भर देण्यात आला.केंद्रातील रिक्त पदभरतीसाठी मंत्रालयात पदमान्यता मिळविण्यासाठी पाठपुरावा करणे, संगणक प्रयोगशाळा उभारणे, केंद्राची संकेतस्थळ आणि भ्रमणध्वनी अनुप्रयोग तयार करणे, तसेच आवश्यक भौतिक साधनसामग्रीची यादी तयार करून निधी उपलब्ध करून देण्याबाबतही सकारात्मक भूमिका घेण्यात आली. बांबूशी संबंधित राज्य व केंद्र शासनाचे आवश्यक नियम, धोरणे आणि कायदे तयार करण्यासाठी स्वतंत्र प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश आ. मुनगंटीवार यांनी दिले.बांबू हे केवळ वनउत्पादन नाही, तर भविष्यातील हरित अर्थव्यवस्थेचा मजबूत आधार आहे. चिचपल्लीचे बांबू संशोधन व प्रशिक्षण केंद्र हे चंद्रपूरसाठीच नव्हे तर संपूर्ण देशासाठी आदर्श संशोधन, प्रशिक्षण आणि रोजगारनिर्मितीचे केंद्र बनले पाहिजे, असे आ. सुधीर मुनगंटीवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

# नागपूरमध्ये आंतरराष्ट्रीय पुस्तक दिन उत्साहात साजरा

दैनिक वादळ वार्ता

**नागपूर । प्रतिनिधी**




स्थानिक कला आणि वाणिज्य रात्र महाविद्यालयात 'आंतरराष्ट्रीय पुस्तक दिना'निमित्त विशेष स्मृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे आणि डिजिटल युगातही साहित्याचे महत्त्व अधोरेखित करणे, हा या कार्यक्रमाचा प्रमुख उद्देश होता.या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. अशोक खोब्रागडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. आपल्या मार्गदर्शनपर भाषणात त्यांनी पुस्तके ही विद्यार्थ्यांची निष्ठावान सोबती असल्याचे सांगत, ज्ञानार्जनासाठी ग्रंथालयाचा अधिकाधिक उपयोग करण्याचे आवाहन केले. वाचन ही केवळ सवय नसून व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली आहे, असे ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. हिरालाल मेश्राम होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी रात्र महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसमोरील आव्हानांचा उल्लेख करत, अनेक विद्यार्थी नोकरी आणि शिक्षण यांचा समतोल राखत असल्याचे सांगितले. वाचनाची सवय हाच यशस्वी आयुष्याचा भक्कम पाया आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाबरोबरच अवांतर वाचनालाही वेळ द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन प्रा. आतिश राठोड यांनी केले. त्यांनी या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व मान्यवर, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमाला डॉ. राजेश बावनकुळे, प्रा. लवकुमार हारामी, प्रा. अरविंद गिरडे, डॉ. लक्ष्मी चरपे, प्रा.सुनील कोचे, प्रा. राजेश अंधारे, प्रा. राजेश सोनकुसरे, प्रा. गौरव गजबे, प्रा. रोहिणी पिंपळकर, प्रा. उमाकांत बल्ले, प्रा. आशिष झा, डॉ. शिल्पा मेश्राम, डॉ. अर्चना अंतूरकर तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ३६ वर्षांनंतर पुन्हा उजळली भक्तीची ज्योत उभरे गावात कनेर कानुबाई मातेचा जयघोष





दैनिक वादळ वार्ता

**धुळे । प्रतिनिधी**

साक्री तालुक्यातील उभरे गावात तब्बल ३६ वर्षांनंतर कनेर राजासह कानुबाई मातेचा दहा दिवसीय उत्सव मोठ्या भक्तिभावाने सुरू झाला असून संपूर्ण गाव सध्या भक्तिमय वातावरणाने न्हाऊन निघाले आहे. या ऐतिहासिक पुनरारंभामुळे गावकऱ्यांमध्ये विशेष उत्साह व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. गावातील कमलेश शेवाळे यांच्या निवासस्थानी या उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. उत्सवाच्या प्रारंभी पारंपरिक ध्वज मिरवणूक काढण्यात आली. त्यानंतर कानुबाई मातेच्या स्थापनेशेजारी ध्वज रोवून विधिवत कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. दररोज सायंकाळी सात वाजता संपूर्ण गावकरी एकत्र येत नित्यनियमाने कानुबाई मातेची आरती करीत आहेत. विशेष म्हणजे या आरतीचे वैशिष्ट्य म्हणजे दररोज नव्या जोडप्यांच्या तसेच तरुण मुला-मुलींच्या हस्ते मातेची आराधना केली जात आहे. त्यामुळे नव्या पिढीतही भक्तीची परंपरा रुजताना दिसून येत आहे. गावात सर्वत्र कानुबाई मातेचा गजर सुरू असल्यामुळे उभरे गाव पूर्णतः भक्तिरसात तल्लीन झाले असून वातावरणात भक्तीभावाचे स्वर घुमत आहेत. तब्बल ३६ वर्षांनंतर हा उत्सव पुन्हा सुरू झाल्याने उभरे गावासह सोळा गाव काटवाण परिसरातही भक्ती आणि उत्साहाचे विशेष वातावरण निर्माण झाले आहे. ३६ वर्षांनंतर पुन्हा सुरू झालेल्या या उत्सवामुळे ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि श्रद्धेचे दर्शन घडत असून, हा सोहळा गावाच्या सांस्कृतिक परंपरेला नवे बळ देणारा ठरत आहे.

# दर्जेदार आणि गुणवत्तापूर्वक विद्यार्थी घडवा-पालकमंत्री डॉ.अशोक वुईके

## जिल्हा परिषद येथे जिल्हास्तरीय स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ

दैनिक वादळ वार्ता

**चंद्रपूर । प्रतिनिधी**






विद्यार्थी हा आपला केंद्रबिंदू आहे. शिक्षण केवळ नोकरीसाठी नाही, तर विद्यार्थ्यांना संस्कारक्षम बनवण्यासाठी आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमध्ये भावनिक, अध्यात्मिक बुद्धिमत्ता निर्माण झाली पाहिजे. तसेच त्यांना सामाजिक भानसुध्दा असावे. कठीण आणि संकटाच्या वेळी कसा निर्णय घ्यायचा, ही क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे. दर्जेदार आणि गुणवत्तापूर्वक विद्यार्थी घडविला तर समाज आणि देशाचे भवितव्य उज्वल होईल, त्यांना घडवण्याची नैतिक जबाबदारी आपली आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले. सर्वांगीण शैक्षणिक गुणवत्ता कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या बक्षीस वितरण समारंभात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह, जिल्हा ग्रामीण यंत्रणेच्या प्रकल्प संचालक मंजिरी टकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी नूतन सावंत, शिक्षणाधिकारी राजेश पाताळे, अश्विनी केळकर यांच्यासह मंचावर पालकमंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांसोबत उन्नती वडसकर, फाल्गुनी पोतराजे आणि गायत्री बांदुरकर या विद्यार्थिनींना सुद्धा मानाचे स्थान देण्यात आले. जिल्हा परिषदेच्या पाचव्या वर्गात माझे शिक्षण झाले, तो दिवस मला आज आठवला, असे सांगून पालकमंत्री डॉ. वुईके म्हणाले, शिक्षणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या संविधानाच्या माध्यमातून या देशाचा राज्यकारभार सुरू आहे. जर संविधान नसते तर मी सुद्धा तुमच्यासमोर उभा नसतो. बक्षीस हा सन्मान असला तरी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ज्यांनी मेहनत घेतली त्या शिक्षकांचे व पालकांचे मनपूर्वक अभिनंदन करतो. आपल्या जिल्ह्याला प्रथमच महिला जिल्हाधिकारी म्हणून वसुमना पंत लाभल्या आहेत. स्त्री केवळ शक्ती नाही, तर परिवर्तन करण्याची ऊर्जा आहे. स्त्रीचा सन्मान म्हणजे राष्ट्राचा सन्मान आहे. या जिल्ह्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून चांगला बदल घडून येईल. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह यांच्या नवीन कल्पनेनुसार जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत म्हणाल्या, सात-आठ महिन्यांपासून अतिशय चांगला उपक्रम जिल्हा परिषद मध्ये सुरू आहे. निपुण या उपक्रमामध्ये जिल्ह्याला तिसरा क्रमांक प्राप्त झाला. यासाठी सर्व शिक्षकांनी आणि विद्यार्थ्यांनी चांगली मेहनत घेतली. तर मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंह म्हणाले, जिल्हा परिषदेच्या पाच शाळांमध्ये रोबोटिक्स उपक्रम राबविण्यात येत आहे. सोबतच ई-चावडी वाचन सुद्धा करण्यात येते. जिल्हास्तरावर विविध स्पर्धा घेण्यात आल्या. निपुण मध्ये जिल्ह्याची प्रगती चांगली आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिक्षणाधिकारी अश्विनी केळकर यांनी केले. संचालन एकता बंडावर यांनी तर आभार विनीत मत्ते यांनी मानले.

स्पर्धेतील विजेत्यांना प्रमाणपत्राचे वाटप : जिल्हा परिषदेमार्फत पाच प्रकारच्या स्पर्धा घेण्यात आला. या स्पर्धेचे जिल्हास्तरीय बक्षीस वितरण पालकमंत्री अशोक वुईके यांच्या उपस्थितीत करण्यात आले. यात प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रथम क्रमांक संस्कार कारेकर, द्वितीय स्वराज नन्नावरे, तृतीय क्रमांक नैतिक कुचनकर यांनी प्राप्त केला. चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक पूर्वी केळझरकर, द्वितीय दिव्या आरकिनवार, तृतीय श्रेयस मराठे यांनी, निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मानसी ढूमने, द्वितीय अपेक्षा बेताल, तृतीय गायत्री बांदुरकर यांनी, वकृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक प्रांजली आवारी, द्वितीय माही वासेकर, तृतीय कनिष्क कांबळे यांनी तर चावडी वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक देवांश परतेकी, द्वितीय ईश्वरी मोहुर्ले आणि तृतीय क्रमोक सोमानी गोरे यांनी प्राप्त केला. सर्व विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

# सूर्यकांत काळे यांच्या सारख्या शिक्षकांची समाजाला गरज-खा.बजरंग सोनवणे

## केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांचा सेवागौरव सोहळा थाटात संपन्न,शैक्षणिक राजकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केंद्रीय मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांनी माळेगावच्या शाळेला पीएमश्री योजनेत स्थान मिळवून देऊन ग्राम विकासात मोठे योगदान दिले.त्यांच्यासारख्या कर्तव्यनिष्ठ शिक्षकांची जिल्हा परिषद शाळांना गरज आहे,असे प्रतिपादन खासदार बजरंग सोनवणे यांनी केले.प्राथमिक शिक्षण चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते तथा साळेगाव जिल्हा परिषद प्रशाले तील केंद्रीयमुख्याध्यापक सूर्यकांत तुकाराम काळे यांच्या सेवानिवृत्ती निमित्त माळेगावात गौरवसोहळा झाला.बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते सूर्यकांत व सुरेखा काळे यांचा भव्य पुष्पहार व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.डॉ.संजय शिंदे यांनी सन्मानपत्राचे लेखन तर अरुण शिंदे यांनी वाचन केले. कार्यक्रमास माजी आ.पृथ्वीराज साठे, माजी आ.संगीता ठोबरे, माजी पं.स.सभापती राजेसाहेब देशमुख, अनुराधा नखाते, नगराध्यक्षा डॉ.सौ. सीताताई बनसोड, हारुणभाई इनामदार, नबाब मामु,डॉ.देवेंद्र डोके,बालासाहेब जाधव, बाळकृष्ण भवर,सरपंच कैलास पाटील,माजी मुख्याध्यापक पी.के. देशमुख,'छावा'चे जिल्हाध्यक्ष शिवाजी ठोंबरे आदीची प्रमुख उपस्थिती होती.सूर्यकांत काळे यांनी गेल्या साडेतीन दशकात जिल्हा परिषद शाळेसाठी दिलेल्या योगदानाबद्दल हा गौरव सोहळा होत असल्याचे प्रास्ताविकात मुख्याध्यापक अर्जुन बोराडे म्हणाले.तर हाच धागा पुढे पकडून खासदार बजरंग सोनवणे म्हणाले,सूर्यकांत काळे यांना गेल्या चार दशकां पासून आपण ओळखत असून ग्रामीण विद्यार्थ्यां साठी त्यांची तळमळ जवळून पाहिली आहे. त्यांच्यासारख्या हरहुन्नरी, धडपड्या व कर्तव्यनिष्ठ शिक्षकांची समाजाला गरज आहे.शाळेसोबतच केज तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचे त्यांनी उत्तम काम केल्याचा गौरवही त्यांनी केला.तर साळेगाव शाळा केज तालुक्यातच नव्हे तर जिल्ह्यात आदर्श बनविण्यात श्री.काळे यांचे योगदान असल्याचे गटशिक्षणाधिकारी सुनील केंद्रे म्हणाले.सर्व शाळेतील सर्व सहकारी व गावकऱ्यांच्या मदतीने शाळेचा चेहरा मोहरा बदलण्यात आपण यशस्वी ठरलो असे मुख्याध्यापक सुर्यकांत काळे सत्काराला उत्तर देताना म्हणाले की.चारे या खेड्यातून अत्यंत कष्ट व जिद्धीमुळेच आपण इथपर्यंत पोहोचल्याचे ते म्हणाले.गोविंद मुळे यांनी सूत्रसंचालन तर अरुण पवार यांनी आभार मानले.कार्यक्रमासाठी माजी मुख्याध्यापक पी. के.देशमुख,श्री.चवरे, अक्षय व राजेश काळे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास शिक्षण, राजकीय,सामाजिक क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**खासदार बजरंग सोनवणे यांच्या हस्ते मुख्याध्यापक सूर्यकांत काळे यांचा सपत्नीक गौरव करण्यात आला. यावेळी राजेसाहेब पापा देशमुख,पृथ्वीराज साठे, सुनील केंद्रे,अंकुशराव इंगळे,शिवाजी ठोंबरे यांची व्यासपीठावर उपस्थित होती.**

## जेष्ठ नागरिक संघाचा वर्धापनदिन उत्साहात संपन्न,आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी जेष्ठ नागरिकांनी सक्रीय राहावे-प्राचार्य दामोधर थोरात

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**




जेष्ठ नागरिक संघ केज जि.बीड चा वर्धापन दिन १८ एप्रिल २०२६ रोजी केज येथे मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला यावेळी फेस कॉम दक्षिण विभागाचे अध्यक्ष प्राचार्य दामोधर थोरात यांनी उपस्थित ज्येष्ठांना मार्गदर्शन करताना सांगितले की,जेष्ठ नागरिकांनी आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य व्यवस्थित राहण्यासाठी जेष्ठ नागरिकांनी सक्रीय राहावे.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केज तालुका जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष माननीय राजेसाहेब देशमुख होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक केज च्या जेष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री.गदळे जी.बी.यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जेष्ठ नागरिक संघाचे सहसचिव श्री.साखरे डी. एस.यांनी केले.जेष्ठ नागरिक संघाचे श्री. जाधव एल.ए.यांनी उपस्थित नागरिकांचे आभार मानले.या कार्यक्रमाला लातूर येथील माजी सचिव प्राध्यापक प्रभाकर कापसे,बीड जिल्ह्याचे समन्वयक श्री.मामडगे जे.डी,अंबाजोगाई जेष्ठ नागरी संघाचे अध्यक्ष अनंतराव जगतकर, तसेच माजलगाव जेष्ठ नागरिक संघाचे सचिव श्री कांतराव गाजरे उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी केज तालुका जेष्ठ नागरिक संघाचे कोषाध्यक्ष श्री.रामेश्वर जाजू यांनी सहकार्य केले.स्वामी विवेकानंद विद्यामंदिर मंगळवार पेठ केज येथे पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात साने गुरुजींच्या खरा तो एकची धर्म या प्रार्थनेने झाली आणि सुरुची भोजनाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## वर्षा केंद्रे यांना डॉ.भीमराव आंबेडकर उत्कृष्ट सरपंच राष्ट्रीय पुरस्कार जाहीर

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर । प्रतिनिधी**

वर्ल्ड एक्सलन्स बुक ऑफ रेकॉर्ड स्टार्टअप शिक्षा फाउंडेशन दिल्ली च्या वतीने कुमठा खुर्द तालुका उदगीर येथील सरपंच तथा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार )पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष युवा नेते सुनील केंद्रे यांच्या पत्नी सौ. वर्षा सुनील केंद्रे यांना स्टार्टअप शिक्षा फाउंडेशन दिल्ली वर्ल्ड एक्सप्रेस बुक ऑफ रेकॉर्ड च्या वतीने डॉ.भीमराव आंबेडकर उत्कृष्ट सरपंच राष्ट्रीय पुरस्कार २०२६ जाहीर करण्यात आला. समता बंधुता न्याय महिला सक्षमीकरण ग्रामपंचायतच्या माध्यमातून पिण्याच्या पाण्याची सोय, रस्ते तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अनेक योजना प्रभावीपणे राबवून एक आदर्श निर्माण केल्यामुळे हा मानाचा पुरस्कार त्यांना अनेक सामाजिक संघटनांच्या शिफारशीमुळे जाहीर करण्यात आला. त्यांच्या सरपंच पदाच्या कार्यकाळामध्ये गावामध्ये शांतता एकोपा व समानता निर्माण करण्याचे काम त्यांनी केलं, अतिशय गरीब परिस्थितीतून त्यांनी आपले पती युवा नेते सुनील व्यंकटराव केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवले. कुमठा खुर्द या गावांमध्ये आज तागायत जी कामे झाली नव्हती ती त्यांच्या काराकीर्दीत झाली, म्हणून त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आला. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान या अभियानामध्ये सहभाग घेऊन आपल्या गावाचे महाराष्ट्रात नाव लौकिक होण्यासाठी पुढाकार घेतला व ते यशस्वीपणे राबवला. वृक्षारोपण असेल किंवा गावातील प्रलंबित असलेली रस्ते त्यांच्या नेतृत्वात खुले करण्यात आले एक आदर्श व्यक्तिमत्व म्हणून युवा नेते सुनील केंद्रे आणि त्यांच्या पत्नी उत्कृष्ट सरपंच वर्षाताई सुनील केंद्रे आज सामाजिक कार्यात अग्रेसर आहेत या पुरस्कारासाठी महाराष्ट्रातून पाच महिलांची निवड करण्यात आली, त्यात प्रथम नाव वर्षाताई सुनील केंद्रे यांचं आहे. येत्या काही दिवसात कुमठा खुर्द तालुका उदगीर या गावात हा पुरस्कार प्रदान सोहळा पार पडणार आहे. हा मानाचा पुरस्कार मिळाल्या मुळे अनेक सामाजिक संघटना, पक्ष यांच्याकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्वाप्टबाल स्पर्धेत साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी चौरे स्वाती श्रीकिसन ला रजतपदक

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

नवी दिल्ली येथे दि.१६ एप्रिल २०२६ ते २२ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या ६९ व्या शालेय राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेत १४ वर्षे वयोगटात येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाची विद्यार्थिनी कु.चौरे स्वाती श्रीकिसन हिला रजतपदक मिळाले आहे.या स्पर्धेत महाराष्ट्र राज्य संघाला द्वितीय क्रमांक प्राप्त झाले.

रजतपदक प्राप्त विद्यार्थ्यांनी कु.चौरे स्वाती श्रीकिसन हिचा सत्कार बीड जिल्हा ऊसतोड कामगार विकास मंडळाचे अध्यक्ष अँड.उद्धवराव कराड साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी प्राचार्य डॉ. कविता गित्ते- कराड मॅडम,संस्थेचे उपाध्यक्ष राजेश कापसे सर,तसेच शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे तसेच पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.



## ई-चलान खासगी मोबाईल फोनने ई-चलान कापणाऱ्या पोलिसांना लागणार चाप

दैनिक वादळ वार्ता
**छ.संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर-दि.२४ एप्रिल : महाराष्ट्रात व जिल्ह्यात खासगी मोबाईल फोनचा वापर करून ई-चलान (श-लहरश्रश्ररप) कापणाऱ्या पोलिसांवर आता कडक कारवाई होणार आहे. वाहतूक नियमांची अंमलबजावणी अधिक पारदर्शक आणि शिस्तबद्ध करण्यासाठी प्रशासनाने हे पाऊल उचलले आहे.

**काय आहे नेमका मुद्दा?**

काही ठिकाणी पोलिस कर्मचारी स्वतःच्या (खासगी) मोबाईल फोनवरून ई-चलान कापत असल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या.

यामुळे डेटा सुरक्षा, पारदर्शकता आणि गैरव्यवहार याबाबत प्रश्न निर्माण होत होते.

**नवीन नियम काय सांगतात?**

ई-चलान काढण्यासाठी फक्त अधिकृत (सरकारी) डिव्हाइस आणि ॲप्सच वापरावे लागतील

खासगी मोबाईलवरून चलान कापणे नियमबाह्य ठरणार आहे

नियम मोडणाऱ्या पोलिसांवर शिस्तभंगाची कारवाई होईल

**यामागचा उद्देश**

नागरिकांशी होणारा व्यवहार पारदर्शक ठेवणे

भ्रष्टाचाराला आळा घालणे

सर्व चलान नोंदी सरकारी प्रणालीमध्ये व्यवस्थित साठवणे

**नागरिकांनी काय लक्षात ठेवावे?**

जर पोलिसांनी ई-चलान काढले, तर ते अधिकृत मशीन/डिव्हाइसवरूनच असावे

चलान मिळाल्यावर डचड किंवा अधिकृत रिसीट मिळणे आवश्यक आहे

शंका असल्यास संबंधित वाहतूक विभागात तक्रार करू शकता.एकूणच, हा निर्णय नागरिकांचा विश्वास वाढवण्यासाठी आणि वाहतूक व्यवस्थेत शिस्त आणण्यासाठी महत्त्वाचा मानला जातो.

## मोलगी हादरले! तरुणीवर अत्याचार करुन विष पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न; दोघांविरुद्ध गुन्हा दाखल

दैनिक वादळ वार्ता
**रवींद्र वळवी । मोलगी**

नंदुरबार जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील मोलगी पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना समोर आली आहे. एका १९ वर्षीय तरुणीला फूस लावून पळवून नेणे, तिच्यावर अत्याचार करणे आणि त्यानंतर तिला विष पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, तोंडीकुंड येथील रहिवासी असलेली १९ वर्षीय तरुणी २२ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री आपल्या घरी एकटी झोपलेली होती. यावेळी संशयित आपसिंग दिला तडवी याने तिला फोन करून द्राक्षे घ्यायला ये असे खोटे आमिष दाखवून घराबाहेर बोलावले. तरुणी घराबाहेर पडली असता, आरोपी आपसिंग आणि त्याचा साथीदार चंदा रामा तडवी (दोन्ही राहणार ओघाणी) हे एका पांढऱ्या बोलेरो गाडीसह उभे होते. तरुणी गाडीजवळ येताच आरोपी आपसिंग याने तिचा हात धरून ओढाताण करत तिला बळजबरीने गाडीत ओढले. पीडितेने आरडाओरडा करण्याचा प्रयत्न केला असता, संशयित चंदा तडवी याने तिच्या तोंडात कापडी रुमाल कोंबला आणि आवाज केला तर जिवंत मारून टाकू, अशी धमकी दिली. आरोपींनी तिला चिवलउतार गावच्या शिवारातील एका निर्जन ठिकाणी नेले. त्या ठिकाणी आरोपी आपसिंग याने पीडितेच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने अत्याचार केला.




घटनेचे गांभीर्य एवढ्यावरच थांबले नाही, तर आपले पाप लपविण्यासाठी आणि पीडितेचा कायमचा काटा काढण्यासाठी दोन्ही आरोपींनी तिला जवळ असलेल्या बाटलीतील विषारी द्रव्य जबरदस्तीने पाजले. या घटनेनंतर पीडितेवर खासगी दवाखान्यात उपचार सुरू होते. प्रकृतीत सुधारणा झाल्यानंतर पीडितेने दिनांक २६ रोजी आपल्या नातेवाईकांसह पोलीस ठाण्यात हजर राहून तक्रार दिली.मोलगी पोलिसांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम १३७(२), ६१(१), ७४, ७५(१), ८७, १०९ आणि ३(५) अन्वये महिला पोलीस कॉन्स्टेबल मंगला पाडवी यांनी गुन्हा दाखल केला असून. सहाय्यक पोलीस निरीक्षक धर्मराज पटले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सुजित पाटील हे पुढील तपास करत आहेत.या घटनेमुळे मुळे अक्कलकुवा तालुक्यात तीव्र संताप व्यक्त केला जात असून, पोलीस फरार आरोपिंचा कसून शोध घेत आहेत.

## कोठारी-हिमायतनगर रस्त्याच्या दर्जाबाबत संताप





दैनिक वादळ वार्ता
**किनवट । प्रतिनिधी**

रस्ता धड नाही, मग टोल कशासाठी, असा संतप्त सवाल नांदेड भोकर-हिमायतनगर-किनवट या राष्ट्रीय महामार्गावरून प्रवास करणारे वाहनधारक उपस्थित करत आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र. १६१ (ए) वरील कोठारी ते हिमायतनगर या टप्प्यातील कामाचा दर्जा सुमार झाला आहे. परंतु दुधगावजवळ टोल प्लाजाचे काम चालू आहे.तरी आधी महामार्ग दुरुस्त करण्याची मागणी वाहन चालकाकडून होत आहे. कोठारी ते इसलापूर आणि हिमायतनगर दरम्यान झालेल्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामात अनेक त्रुटी आहेत. अनेक ठिकाणी रस्ता खचला असून तडे गेले आहेत. महामार्गपेक्षा पूर्वीचा डांबरीकरणाचा राज्य मार्गच बरा होता, असे म्हणण्याची वेळ आली आहे.किनवट कोठारी हिमायतनगर भोकर राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करूननंतरच टोल वसुली करावी अशी मागणी नागरिकाकडून होत आहे.

अगोदर कामाला दर्जा द्यावा आणि रस्ता सुस्थितीत करावा. त्यानंतरच टोल शुल्क वसूल करावी. निकृष्ट रस्त्यासाठी आम्ही पैसे का मोजायचे, असाही प्रश्न वाहनचालक उपस्थित करु लागले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077